॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ११ : कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचा, जीवनदृष्टीचा आणि संवेदनशील भावविश्वाचा सांगीतिक नाट्याविष्कारातून वेध घेणारा 'सांगे बहिणा' हा विशेष कार्यक्रम कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने मंगळवारी (दि. ११ ऑगस्ट) उत्स्फूर्त वातावरणात संपन्न झाला.

यावेळी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, माजी कुलगुरू डॉ. के बी पाटील, माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, प्र कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, सी ए अनिल राव, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, डॉ. जगदीश पाटील, प्रा. सुरेखा पालवे, सी ए रवींद्र पाटील, प्रा. योगेश पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिसभा सदस्य स्वप्नाली काळे, माजी अधिसभा सदस्य मनिषा खडके, प्रशाळा संचालक प्रा. म. सु. पगारे, प्रा. भूषण चौधरी, डॉ. चंद्रशेखर वाणी, डॉ. राजेश जवळेकर, विभागप्रमुख विजय आहेर, जळगाव शहरातील प्रतिष्ठित नागरिक मान्यवर, विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृहात दुपारी ४ ते ६ या वेळेत हा कार्यक्रम संपन्न झाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या गीतांमधील ग्रामीण जीवन, निसर्ग, कष्टकरी माणूस, स्त्रीजीवन, नातेसंबंध, संस्कार आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान यांचा कलात्मक आविष्कार या कार्यक्रमातून सादर करण्यात आला.

'सांगे बहिणा' या सांगीतिक नाट्याविष्काराची संकल्पना, संगीत, गायन आणि नाट्यदिग्दर्शन कल्याणी साळुंके यांनी केले. बहिणाबाईंच्या भूमिकेत मनीषा कोल्हे यांनी प्रभावी अभिनय साकारला. संहिता लेखन चंद्रशेखर पाचपांडे, तर नेपथ्य संतोष सातारकर यांचे होते. कार्यक्रमात श्रेय पांचाळ, भारती बोंडे, वंदना पाटील, डॉ. मृदुला चौधरी, शर्मिला जावळे, तनुश्री सावंत, राजश्री सरोदे, श्रुती भिडे, कुमुदिनी पाटील आणि प्राजक्ता हरवंदे यांनी सहकलाकार म्हणून भूमिका बजावल्या. बालकलाकार म्हणून स्वरांग भिडे आणि तिथी हरवंदे यांनी सहभाग घेतला.

बहिणाबाईंच्या साध्या, सहज आणि लोकभाषेतील गीतांमधून व्यक्त होणाऱ्या गहन जीवनदृष्टीला संगीत, अभिनय आणि नाट्यरूपाची जोड देत कलाकारांनी रसिकांसमोर सादर केले. बहिणाबाईंच्या कवितांतील भावभावना, त्यांचे अनुभवविश्व आणि त्यांच्या शब्दांमधील जीवनाचे तत्त्वज्ञान यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. गीत, संगीत, अभिनय आणि नाट्यदिग्दर्शनाचा सुरेख मेळ साधल्याने उपस्थित रसिकांनी या सांगीतिक नाट्याविष्काराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचा नव्या पिढीशी सांस्कृतिक व भावनिक संवाद घडवून आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. बहिणाबाईंच्या साहित्याचा केवळ अभ्यास न करता त्यांच्या रचनांचा कलात्मक अनुभव देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. ११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि केशव स्मृती प्रतिष्ठान, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय विद्यापीठस्तरीय वनराई बंधारा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. युवकांच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि प्रत्यक्ष श्रमाच्या माध्यमातून पार पडलेल्या या उपक्रमातून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संदेशाला नवी ऊर्जा मिळाली.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, केशव स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष भरत अमळकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. प्रविण महाले तसेच केशव स्मृती प्रतिष्ठानचे संचालक शिवाजीराव भोईटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जळगाव जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून १५० हून अधिक विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी तसेच सामाजिक शास्त्रे विभागातील स्वयंसेवक मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभागी झाले. या कार्यशाळेत पाण्याचे महत्त्व, जलसंधारणाची आवश्यकता आणि वनराई बंधारा बांधण्याचे शास्त्रोक्त तंत्रज्ञान या विषयांवर तांत्रिक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. वनराई बंधारा उभारण्यासाठी आवश्यक असलेली रचना, योग्य पद्धत, उपलब्ध साधनसामग्रीचा वापर आणि जलसाठा निर्माण करण्याचे तंत्र याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे, केवळ सैद्धांतिक माहिती न देता प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून वनराई बंधारा उभारणीचे तंत्र विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकविण्यात आले.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे प्रा. मनोज इंगोले, केशव स्मृती प्रतिष्ठानचे आदित्य साबळे, शरद पाटील, कैलास औटी आदींनी परिश्रम घेतले.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ११ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी, जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता